
*सारांश :-*

प्रस्तुत संशोधनात धुळे तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेण्यात आलेला आहे. त्यासाठी 179 विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पद्धतीने नमुना निवड करण्यात आली. माहिती संकलनासाठी डॉ. आभाराणी बिस्त यांच्या प्रमाणित शैक्षणिक ताण चाचणीचा तसेच डॉ.एन.एस.चव्हाण व डॉ.जी.पी.तिवारी यांच्या वैफल्य चाचणीचा वापर करण्यात आला. पिअरसनच्या परिघात परिगुणन पद्धतीने शैक्षणिक ताण व वैफल्य या दोन चलांमधील सहसंबंध काढण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांच्या संपूर्ण गटातील विद्यार्थी, मुली, व शहरी भागातील विद्यार्थी यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात धन सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही असे आढळून आला. तसेच मुले, कला व विज्ञान शाखेचे विद्यार्थी यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात धन सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही असे आढळून आले. मात्र ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात ऋण सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही असे आढळून आले.

**शोभा महारु चौधरी**

सहाय्यक प्राध्यापक , धुळे एज्युकेशन सोसायटीचे
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे.



# कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास



## प्रस्तावना :-

शालेय जीवनात मुलाला सातत्याने अपयश आल्यामुळे ब–याच मुलांमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होते. या मुलांबरोबर इतर मुले मैत्री करण्यासही पुढे येत नाहीत. या मुलांबाबत काही शिक्षक ही उदासीनता दाखवितात. मुलांचे चित्त कशातच धड लागू शकत नाही. त्यांच्यात बेशिस्त प्रवृत्ती वाढू लागते. काही पालक मुळात अशिक्षित असतात. शिक्षणाचे महत्व त्यांना नसते. आपल्या मुलांच्या शालेय प्रगतीबाबत ते फारशी जागरुकता दाखवत नाहीत. यामुळे मूल अपयशी होत जाते. याबाबत जर टोचणी दिली गेली. तर मुलाच्या मनावर दडपण येते. काही कुटुंबामध्ये योग्य सांस्कृतिक वातावरणाची पूर्णतः अभाव असतो. मुलाला ज्ञानार्जनासाठी कमी साधने, संधी आणि सोयी उपलब्ध असतात. काही पालक मुलाच्या प्रगतीबाबत फारसे जागृत नसल्यामुळे ते मुलाच्या गृहपाठात, अभ्यासात त्यांना फारशी मदत करु शकत नाहीत. त्यामुळे मुलांचा बौध्दिक विकास फार वेगाने होत नाही. शैक्षणिक पातळीवर मूल मागे पडू लागल्यावर त्याच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. वर्गातील इतर मुलांबरोबर त्याची तुलना होते. त्यामुळे मुलांना ताण होतो. याउलट काही वेळा मुलांची क्षमता नसतांना पालकांनी त्यांच्याकडून अवास्त्व अपेक्षा ठेवल्या तर मुलांना शैक्षणिक ताण येतो. या ताणामुळेच पुढे मुलांमध्ये वैफल्य निर्माण होते.

## संशोधनाची गरज :

आजच्या काळात शिक्षण क्षेत्रात वाढत जाणारी तीव्र स्पर्धा, पालकांच्या मुलांकडून वाढणा'–या अवास्तव अपेक्षा, शिक्षकांच्या विद्यार्थ्यांकडून अपेक्षा आणि त्याचा विद्यार्थ्यांना येणारा ताण. त्यामुळे ब–याचशा विद्यार्थ्यांना वैफल्य येते. इयत्ता 11 वी च्या वर्गातील विद्यार्थी हे नुकतेच माध्यमिक शिक्षण पूर्ण करुन आलेले असतात. त्यांच्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील वातावरण पूर्णपणे वेगळे असते. बदलणारा अभ्यासकम, अभ्यासकमाचे माध्यम, शिक्षकांच्या अध्यापनाच्या पध्दती या सर्व गोष्टी या विद्यार्थ्यांसाठी नवीन असतात. त्यातून प्रत्येक वेळी विद्यार्थी आपली तुलना वर्गातील हुशार विद्यार्थ्यांशी करायला लागतात. त्यामुळे ब–याच वेळा विद्यार्थ्यांना शैक्षणिक ताण येतो. काही विद्यार्थ्यांची बौध्दिक क्षमता ही कमी असते. अशा वेळी त्यांना परीक्षेची भीती वाटते, अपयशाची भीती वाटते. काही विषय त्यांना अवघड वाटतात. त्यामुळे त्यांना शैक्षणिक ताण येतो. या शैक्षणिक ताणाचा परिणाम म्हणून काही विद्यार्थ्यांमध्ये वैफल्य निर्माण होते. इतर विद्यार्थ्यांपेक्षा मी खूपच मागे आहे. मला कधीही चांगले मार्कस मिळणार नाहीत अशी नकारात्मक भावना त्यांच्यात निर्माण होते. त्यांचा आत्मविश्वास ढासळतो. म्हणजेच शैक्षणिक ताणामुळे वैफल्याची बरीच लक्षणे विद्यार्थ्यांमध्ये दिसून येतात. अशा विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करता यावे म्हणून प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा तसेच शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात सहसंबंध आहे का ? तो कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच या सहसंबंधाच्या बाबतीत लिंग, शाखा व क्षेत्र या घटकांनुसार वेगळेपण जाणवते का ? या प्रश्नांच्या समाधानकारक उत्तरासाठी या संशोधन अभ्यासाची गरज आहे.

## उद्दिष्टे :

1) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
2) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
3) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलींचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
4) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या कला शाखेच्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
5) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
6) ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
7) शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.

## परिकल्पना :

1) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
2) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
3) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलींचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
4) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या कला शाखेच्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
5) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
6) ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
7) शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात सार्थक

सहसंबंध नसतो.

*न्यादर्श :*

या अभ्यासासाठी धुळे तालुक्यातील तीन ग्रामीण व तीन शहरी कनिष्ठ महाविद्यालयातील इ. 11 वी च्या 179 विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पद्धतीने न्यादर्श म्हणून निवड केली.

*संशोधन साधने :*

या संशोधन अभ्यासासाठी डॉ. आभाराणी बिस्त यांच्या प्रमाणित शैक्षणिक ताण चाचणीचा वापर करण्यात आला. या चाचणीत एकूण 80 विधाने आहेत. प्रत्येक विधानासमोर नेहमी, ब—याच वेळा, कधी कधी, क्वचित, कधी ही नाही असे पाच पर्याय दिलेले आहेत. या चाचणीतील 55 विधाने होकारार्थी असून 25 विधाने नकारार्थी आहेत. त्यांचे गुणदान पुढीलप्रमाणे करण्यात आले.

| विधाने | नेहमी | ब—याच वेळा | कधी कधी | क्वचित | कधीही नाही |
|---|---|---|---|---|---|
| होकारार्थी | 0 | 1 | 2 | 3 | 4 |
| नकारार्थी | 4 | 3 | 2 | 1 | 0 |

या चाचणीचा विश्वसनीयता गुणांक 0.86 असून चाचणीत अंतर्गत रचनात्मक सप्रमाणता आहे. ही चाचणी मूळ हिंदीत असून तिचे मराठीत भाषांतर करण्यात आलेले आहे.

डॉ. एन.एस.चव्हाण व डॉ. जी.पी.तिवारी यांच्या वैफल्य चाचणीत एकूण 40 विधाने असून प्रत्येक विधानासमोर खूपच जास्त, जास्त, सर्वसाधारण, कमी, खूपच कमी, अजिबात नाही असे सहा पर्याय दिलेले आहेत. प्रत्येक विधानाला खालीलप्रमाणे गुणदान केलेले आहे.

| विधान | खूपच जास्त | जास्त | सर्वसाधारण | कमी | खूपच कमी | अजिबात नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 ते 40 | 5 | 4 | 3 | 2 | 1 | 0 |

ही चाचणी मूळ इंग्रजीत असून तिचे मराठीत भाषांतर केलेले आहे.

*कार्यपद्धती :*

या संशोधन अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धती वापरलेली आहे. न्यादर्शाला आवश्यक त्या सूचना देऊन शैक्षणिक ताण व वैफल्य चाचणीच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली. मॅन्युअलनुसार गुणदान करण्यात आले. न्यादर्शाचे संपूर्ण गट, मुले व मुली, कला शाखा व विज्ञान शाखा तसेच ग्रामीण व शहरी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी असे सात गट तयार करण्यात आले.

*संख्याशास्त्रीय तंत्र :* या संशोधन अभ्यासात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसरनच्या परिघात परिगुणन पद्धतीने शैक्षणिक ताण व वैफल्य या चलांमधील परस्पर सहसंबध (त) काढण्यात आला.

संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन : खालील कोष्टकाच्या आधारे केलेले आहे.

***कोष्टक क्रं.1 कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यातील सहसंबंध दर्शविणारी सांख्यिकी***

| गट क्र. | गटाचे नाव | एकूण विद्यार्थी | प्राप्त ‘r‘ | स्वाधीनता मात्रा | सार्थकता स्तर | नमुना ‘r‘ | प्राप्त ‘r‘ व नमुना ‘r‘ ची तुलना | ‘r‘ची सार्थकता | सांख्यिकी भुन्य परिकल्पना निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | संपूर्ण गट | 179 | 0.21 | 177 | 0.05 | 0.14 | 0.21> 0.14 | सार्थक | त्याग |
| 2 | मुले | 92 | 0.14 | 90 | 0.05 | 0.21 | 0.14< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 3 | मुली | 87 | 0.29 | 85 | 0.05 | 0.21 | 0.29> 0.21 | सार्थक | त्याग |
| 4 | कला शाखा | 93 | 0.20 | 91 | 0.05 | 0.21 | 0.20< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 5 | विज्ञान शाखा | 86 | 0.20 | 84 | 0.05 | 0.21 | 0.20< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 6 | ग्रामीण | 87 | —0.08 | 85 | 0.05 | 0.21 | —0.08< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 7 | शहरी | 92 | 0.36 | 90 | 0.05 | 0.21 | 0.36> 0.21 | सार्थक | त्याग |

## *निष्कर्ष :*

कोष्टक क्र.1 वरुन असे निदर्शनास येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या संपूर्ण गटातील विद्यार्थी, मुली, व शहरी भागातील विद्यार्थी यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात धन सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक आहे. म्हणून परिकल्पना क्र.1,3 व 7 यांचा त्याग करण्यात आला. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी ची मुले, कला व विज्ञान शाखेचे विद्यार्थी यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात धन सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही. म्हणून परिकल्पना क्र. 2,4 व 5 चा स्वीकार करण्यात आला. ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक ताण व वैफल्य यांच्यात ऋण सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही म्हणून परिकल्पना क. 6 चा स्वीकार करण्यात आला.

## *संदर्भग्रंथ सूची :*

1.Best John & Khan JAMES V. (2006), Research in Education. New Delhi; Prentice Hall of India Private Limited.
2.Mangal S.K. (November 2006), Statistics in Psychology & Education, New Delhi ; Prentice Hall of India Private Limited.
3.कुलकर्णी के.वि..आठवी आवृत्ती, (जुलै 1999), शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे : श्रीविद्या प्रकाशन.
4.परुळेकर आशा, प्रथमावृत्ती, (जुलै 1990), मुलांचे मानसिक तणाव आणि उपचार, पुणे : उन्मेष प्रकाशन.